<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली यादी</u>

# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) येथे तिलारी नदीपात्रातील बंधा-याचे पाणी खाजगी कंपनीला पुरविण्यात येणार असल्याबाबत

**(१) ८ (२२-१२-२०१४). श्री. नितेश राणे (कणकवली), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि. सिंधुदुर्ग) येथे सुमारे ३०० कोटी रुपये खर्च करुन तिलारी नदीपात्रातून मणेरी पुलाजवळ मोठा बंधारा बांधून ते पाणी वेंगुर्ला तालुक्यातील खाजगी कंपनीला पुरवठा करण्यासाठी जीवन प्राधिकरण विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या बागायतींना उन्हाळयात पाण्याचा तुटवडा जाणवणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हयातील पाण्याचा तुटवडा जाणवू नये म्हणून जीवन प्राधिकरणाकडून कोणत्या स्वरुपाची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव यादव (लोणीकर) (१०-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील होमगार्डना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत

**(२) ९ (२४-१२-२०१४). श्री. नितेश राणे (कणकवली), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. वैभव नाईक (कुडाळ), श्री. भरतशेठ गोगावले (महाड), श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील होमगार्डना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याची मागणी अद्याप पूर्ण करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच सिंधुदुर्ग जिल्यातील ४१८ होमगार्डना गत ४ महिन्यांपासून मानधन देण्यात आले नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) उपरोक्त प्रकरणी शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१५) :** (१) मुंबई होमगार्ड अधिनियम १९४७ मधील तरतूदीनुसार होमगार्ड ही मानसेवी संघटना आहे. होमगार्ड संघटनेत नोंदणी करणारे सदस्य हे नोकरी/ व्यवसाय करणारे असून राष्ट्रसेवा करण्याच्या हेतूने संघटनेचे सदस्य होतात. त्यांचा पदावधी ३ वर्ष इतका असून तो संपण्यापूर्वी ज्यांची सदस्यत्व पुढे चालू ठेवण्याची इच्छा असेल त्यांची पूनर्नोंदणी केली जाते. होमगार्ड संघटना ही निष्काम सेवा असल्यामुळे त्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२), (३) व (४) होमगार्डच्या मानधनाच्या रकमा प्रदान करण्यासाठी हिवाळी अधिवेशन २०१४ मध्ये पुरवणी मागणीद्वारे रु. ५६.६१ कोटी इतका निधी शासनाने मंजूर केलेला असून दि. ०९.०१.२०१५ रोजी सदर निधी महासमादेशक, होमगार्ड कार्यालयाला प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही त्या कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

---

## मुंबईतील दादर येथील शिवाजी पार्क ह्या मैदानाला दिनेश अफझलपूरकर समितीने मोकळी जागा (ओपन स्पेस) म्हणून दिलेला खास दर्जा

**(३) ३० (२३-१२-२०१४). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दादर येथील शिवाजी पार्क ह्या मैदानाला दिनेश अफझलपूरकर समितीने मोकळी जागा (ओपन स्पेस) म्हणून खास दर्जा दिल्याने या मैदानात नव्याने क्लब, जिमखाना किंवा अन्य बांधकामे उभी राहण्याची भिती तज्ञांनी व्यक्त केल्याने शिवाजी पार्क बाबत नवीन वाद निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दादर येथील शिवाजी पार्क बाबत हेरिटेज वास्तू किंवा मोकळे मैदान म्हणून कोणता निर्णय घेतला किंवा घेण्यात येत आहे,
(३) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणताच निर्णय झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०१५) :** (१), (२) व (३) आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी महानगरपालिकेने दिनांक ३१.७.२०१२ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप हेरिटेज यादीमधील शिवाजी पार्क मैदान व शिवाजी पार्क प्रसिमा संदर्भात शासनास अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालानुसार हेरिटेज ओपन स्पेस असा नवीन प्रवर्ग करावा व त्यामध्ये शिवाजी पार्क

मैदानाचा समावेश करावा असा प्रस्ताव आहे. हेरिटेज ओपन स्पेस असा प्रवर्ग निर्माण केल्यामुळे मोकळ्या जागेतील बांधकामावर निर्बंध येणार आहेत अशा जागेत नव्याने क्लब, जिमखाना किंवा अन्य बांधकामे उभी रहाण्याची शक्यता नाही. आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर शासनाकडून निर्णय घेणेचे संकल्पित आहे.

---

**राज्यातील वीज कामगार मेडिक्लेमच्या लाभापासून वंचित असल्याबाबत**

**(४) ६४ (२२-१२-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज कामगारांच्या वेतन करारातून तब्बल २० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असतानाही वीज कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे वीज कामगार मेडिक्लेमच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज कामगारांना मेडिक्लेमचा लाभ देण्याबाबत तसेच त्यांना मेडिक्लेमच्या लाभापासून विंचित ठेवणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०२-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उदभवत नाही.

---

**जव्हार (जि.ठाणे) या तालुक्यातील १४७ स्थळांना पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्याबाबत**

**(५) ७३ (२३-१२-२०१४). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार जि.ठाणे या तालुक्यात १४७ पर्यटनस्थळांची ठिकाणे असून ऐतिहासीक वारसा लाभलेला तालुका असल्यामुळे हा तालुका मिनी महाबळेश्वर म्हणून ओळखला जातो यामुळे या तालुक्यात पर्यटनस्थळ म्हणून घोषित करण्याची येथील आदिवासी ग्रामस्थांनी संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी जव्हार तालुका पर्यटनस्थळ म्हणून घोषीत करण्यात आले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जव्हार तालुका पर्यटनस्थळ म्हणून घोषीत करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१५) :** (१) नाही, अशी मागणी जिल्हाधिकारी, ठाणे व पर्यटन विभागाकडे प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) येथील कमलादेवी नेहरु इंग्रजी शाळेतील विद्यार्थ्याला स्पेलिंग चुकल्यामुळे पट्टीने मारहाण केल्याची घटना**

**(६) ९४ (२२-१२-२०१४). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील कमलादेवी नेहरु इंग्रजी शाळेत पाचवीत शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याला स्पेलिंग चुकल्यामुळे पट्टीने जबर मारहाण करण्यात आल्यामुळे सदर मुलगा गंभीर जखमी झाला असून सध्या बऱ्याच शाळांमध्ये मुलांना जबर मारहाणी होत असल्याच्या घटना घडत असल्याचे प्रकार माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळांमध्ये विद्यार्थ्यांना होणाऱ्या जबर मारहाणीच्या घटना रोखण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०२-२०१५) :** (१) कमलादेवी कान्व्हे स्कुल, बेतुकरपाडा कल्याण (प) या इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या इयत्ता ५ वी या वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांस पट्टीने मारहाण करण्यात आल्याची घटना घडल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आली हे खरे आहे.
(२) शाळेत शिक्षण घेत असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यांस मारहाण करु नये तसेच विद्यार्थ्यांस कोणताही शारिरीक इजा होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी अशा प्रकारच्या सुचना मुख्याध्यापकांच्या आढावा बैठकीत देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या वैद्यकिय शिक्षण विभागात रिक्त असलेली प्राध्यापकांची पदे भरण्याचा घेतलेला निर्णय**

**(७) ९५ (२२-१२-२०१४). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकिय शिक्षण विभागात सुमारे १०९८ प्राध्यपकांची रिक्त असलेली पदे भरण्याचा

निर्णय शासनाने घेतल्याचे माहे जुलै,२०१४ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१५) :** (१) वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत सुमारे १०९८ अध्यापकांची रिक्त असलेली पदे भरण्याचा निर्णय माहे जुलै, २०१४ मध्ये घेतला, हे खरे आहे.
(२) स्वतंत्र निवड समिती व आस्थापना मंडळामार्फत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हापातळीवर जातप्रमाणपत्र पडताळणी समिती स्थापन करण्याबाबत.**

**(८) ९७ (२२-१२-२०१४). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनाने नुकताच जिल्हापातळीवर जातप्रमाणपत्र पडताळणी समिती स्थापन करण्याचा अध्यादेश जारी केला मात्र नव्याने स्थापन करावयाच्या या समित्यांसाठी सदस्य व सदस्य सचिवांची तसेच अन्य कर्मचारी वर्गाची पदे अद्याप निर्माण केली नसल्याचे माहे २४ जून, २०१४ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णय तात्काळ रद्द करावा अशी मागणी सामाजिक न्याय विभागाच्या राजपत्रित अधिकारी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०२-२०१५) :**(१), (२) व (३) जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांच्या कामाचा व्याप विचारात घेवून सध्या अस्तित्वात असलेल्या १५ विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांऐवजी जिल्हा निहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २२.११.२०१३ अन्वये घेण्यात आलेला असून सदर जिल्हा निहाय समित्या कार्यान्वित करण्याचा निर्णय दि.९ जून, २०१४ अन्वये घेण्यात आलेला आहे.

तथापि सदर समित्या कार्यान्वित करण्यासंदर्भात शासनास प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर जिल्हा निहाय समित्या कार्यान्वित करण्यास स्थगिती देण्यात येवून त्यासंदर्भात मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सद्यस्थितीत जिल्हा निहाय समित्या कार्यान्वित करण्याचा व या समित्यांसाठी अधिकारी / कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करण्याचे विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सुदर्शन केमिकल्स या मल्टीनॅशनल कंपनीतील अधिकारी आणि कर्मचारी यांना कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक कपात करण्यात आल्याबाबत

**(९) १०९ (२२-१२-२०१४). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा तालुक्यातील (जि.) रायगड सुदर्शन केमिकल्स या मल्टीनॅशनल कंपनीतील १५३ अधिकारी आणि कर्मचारी यांना कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक कपात करण्यात आले असल्याचे माहे ४ नोव्हेंबर,२०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कर्मचा-यांच्या कपातीमुळे कर्मचा-यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले असल्याने काही सामाजिक कार्यकर्ते व शिष्टमंडळ यांनी मा. मुख्यमंत्री यांना निवेदन दिले अाहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१२-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

तथापि, कंपनीने व्यवस्थापन मनुष्यबळाची पुनर्रचना केल्याने व्यवस्थापनाने कर्मचारी व अधिकारी यांच्याशी केलेल्या चर्चेनुसार ८० व्यवस्थापकीय कर्मचा-यांनी राजीनामे दिले आहेत हे खरे आहे.

(२) श्री.संजय कोनकर मा.जिल्हाध्यक्ष, रायगड यांनी कामगार कपाती बाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे हे खरे आहे.

(३) राजीनामा दिलेल्या ८० व्यवस्थापकीय कर्मचा-यांना आस्थापनाने कायदेशीर देय रक्कम रु.१,५७,१४,८४६/- व सानुग्रह अनुदान म्हणून रु.६७,७९,६१७ /- अदा केलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने पाठ्यक्रमाच्या पुस्तकात होणाऱ्या चुका टाळण्याकरिता सक्षम कार्यप्रणाली राबविण्याबाबत**

**(१०) १११ (२२-१२-२०१४). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता ९ वी, १० वी व १२ वीच्या पाठ्यक्रमाच्या पुस्तकांत एकूण ३७२ बदल करुन घेण्याबाबतचे एक शुद्धीपत्रकच मंडळाने काढले असल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रतिवर्षी पाठ्यक्रमाच्या पुस्तकात होणाऱ्या चुकांमुळे विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे तसेच सदर चुका टाळण्याबाबत शासनाने सक्षम कार्यप्रणाली राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०२-२०१५) :**(१) होय.
(२) पाठ्यपुस्तकाच्या पुढील वर्षाच्या आवृत्तीत चुका होऊ नये म्हणून पुनर्मुद्रणाचे वेळी त्रुटी दुरुस्त करुन पाठयपुस्तकांचे पुनर्मुद्रण केले जाते.

जे विद्यार्थी जुनी पाठ्यपुस्तके वापरतात त्यांचेसाठी पाठ्यपुस्तकाच्या आशयातील राहिलेल्या त्रुटी/बदल व अधिप्रमाणित मध्ये झालेले/दुरुस्त्या शुध्दीपत्रकान्वये मंडळाचे नियतकालीक शिक्षण संक्रमण मधून प्रसिध्द केल्या जातात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील सर्वच जिल्हयांतील प्रमुख रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(११) १२४ (२४-१२-२०१४). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील सर्वच जिल्हयांतील प्रमुख रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे नोव्हेंबर,

२०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयांतील प्रमुख रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी पॅकेज मिळण्याची मागणी येथील जनतेकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०२-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.
(२) रस्त्यांवरील खड्डे भरण्याबाबत मागणी आहे,
(३) व (४) रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे कम प्रगतीत असून सदर काम लवकरच निधी, निकष, प्राथम्यक्रम व मंजूरीनुसार पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**यवतमाळ जिल्हयातील निम्न पैनगंगा प्रकल्प रखडल्याबाबत**

**(१२) १२५ (२२-१२-२०१४). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक महत्वाचे प्रकल्प केवळ वन कायदयाच्या चौकटीमुळे अडकले असून त्यात यवतमाळ जिल्हयातील निम्न पैनगंगा प्रकल्प शासनाच्या दुर्लक्षित धोरणामुळे रखडला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) नागपूर यांनी अदानी ऊर्जा प्रकल्पाला वनजमीन हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव सादर केला मात्र निम्न पैनगंगा प्रकल्पात मंजूरीसाठी अडसर निर्माण करीत असल्याने शेतकऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीअंती निम्न पैनगंगा प्रकल्पास मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
केंद्र शासनाने दिनांक २९/०१/२०१४ च्या पत्रान्वये निम्न पैनगंगा प्रकल्पाकरीता ९९८.१० हेक्टर वनजमिन वळतीकरणास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० खाली औपचारीक मान्यता प्रदान केली आहे तसेच महाराष्ट्र शासनाने दि. २१/०६/२०१४ रोजी वनजमिन वळतीकरणाचे आदेश निर्गमित केले आहे.
(२) हे खरे नाही.

अदानी ऊर्जा प्रकल्पासाठी आवश्यक वनजमिन वळतीकरणास केंद्र शासनाने दि.२९/०८/२०१४ रोजी औपचारीक मान्यता दिली आहे. राज्य शासनाने दि.२०/१०/२०१४ रोजी वळतीकरणाचे आदेश दिले असले तरी त्यास तूर्त स्थगिती दिली असून राज्य शासनाने केंद्रीय वन्यजीव मंडळाच्या मान्यतेच्या आवश्यकतेबाबत केंद्र शासनाकडून दि.२९/१०/२०१४ रोजी फेरविचारणा केलेली आहे तसेच अद्याप वनक्षेत्राचे वळतीकरण झालेले नाही.

निम्न पैनगंगा प्रकल्पा प्रकरणी दि.१८/०७/२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांनी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), यवतमाळ, औरंगाबाद, चंद्रपूर यांना वनजमिन वळतीकरणाचे आदेश दिलेले आहेत. जलसंपदा विभागाने दि.१६/०९/२०१४ रोजी प्रकल्पाचे काम सुरु झाल्यावर प्रस्तावित घळभरणी वर्षाचे दोन वर्षे आधी वनक्षेत्रातील वृक्षतोड करणे संयुक्तीक राहील असे कळविल्यामुळे वृक्षतोड करुन वनक्षेत्र आतापर्यंत हस्तांतरीत करण्यात आले नाही.

(३) निम्न पैनगंगा प्रकल्पांतर्गत वनजमिन वळकतीकरणासाठी केंद्र व राज्य शासनाने मान्यता दिली असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यभरातील कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेच्या प्रकल्पांतील**
**अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे वेतन मिळाले नसल्याबाबत**

**(१३) १२७ (२४-१२-२०१४). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. अनिल कदम (निफाड), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेच्या प्रकल्पांना केंद्र शासनाकडून निधी मिळाला नसल्याने येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे वेतनदेखील मिळाले नसल्याचे दिनांक ८ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पास केंद्र शासनाकडून तातडीने निधी मंजूर करुन वितरीत करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :** (१) व (२) नाही.

राज्यभरातील कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन प्रकल्पातील अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या रु.१८९२.९८ लक्ष प्राप्त निधीतून माहे डिसेंबर, २०१४ पर्यंत वेतन नियमितपणे देण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली ते धामणी व नांदेड जिल्ह्यातील किनवट रेल्वे स्टेशन दरम्यान कॉसिंग रेल्वे उड्डाण पुलाच्या बांधकामाबाबत**

**(१४) १४० (२४-१२-२०१४). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री. प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली ते धामणी व नांदेड जिल्ह्यातील किनवट रेल्वे स्टेशन दरम्यान क्रॉसिंग रेल्वे उड्डाण पुलाच्या बांधकामासाठी राज्य शासनाने ५० टक्के रक्कम भरण्यात येवूनही सदरहू पुलाचे काम अद्यापी सुरू करण्यात आले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन सदरहू पुलाचे काम तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०२-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) नांदेड-किनवट रेल्वे मार्गावरील रेल्वे उड्डाण पुलाचे काम मंजूर असून प्रगतीत आहे. सदर कामासाठी निधी अपुरा असल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यतेनंतर निधीच्या उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

हिंगोली ते धामणी रेल्वे उड्डाण पुलाचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राधाम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**हिंगोली जिल्ह्यातील शतकोटी वृक्ष लागवड योजनेबाबत**

**(१५) १४५ (२३-१२-२०१४). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील पावसाळा संपल्यानंतरही शतकोटी वृक्ष लागवड योजनेमध्ये किती वृक्ष लागवड झाली याचा अहवाल मिळाला नसल्याने रोजगार हमी योजना कार्यालय अडचणीत आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे-पालवे (१६-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दाती (ता.कळमनूरी, जि.हिंगोली) येथील स्वस्त धान्य दुकानदाराने लाभार्थ्यांच्या धान्याची काळ्याबाजारात विक्री केल्याबाबत**

**(१६) १५२ (२३-१२-२०१४). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील कळमनूरी तालुक्यातील दाती येथील स्वस्त धान्य दुकानदाराने दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांचे माल काळ्याबाजारात विक्री केले असल्याचे निवेदन जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे दिनांक २८ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास स्थानिक कार्यकर्त्यांनी दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट (०३-०२-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) मौजे दाती (ता.कळमनुरी,जि.हिंगोली) येथील जिल्हा पुरवठा अधिकारी व तहसीलदार, कळमनुरी यांनी चौकशी केली असता, स्वस्त धान्य दुकानामध्ये गंभीर दोष आढळून आल्याने दिनांक ३ नोव्हेंबर, २०१० च्या आदेशान्वये त्यांचे प्राधिकारपत्र रद्द करुन अनामत जप्त करण्यात आली व तेथील रास्तभाव दुकान मौ.भोसी ता.कळमनुरी जि.हिंगोली येथील स्वस्त धान्य दुकानास जोडण्यात आले.

मात्र या तक्रारीच्या अनुषंगाने यादी दुकानाची तपासणी केली असता, त्यात गंभीर दोष आढळून आल्यामुळे दिनांक २२ डिसेंबर, २०१४ च्या आदेशान्वये त्यांचे प्राधिकारपत्र रद्द करुन अनामत जप्त करण्यात आली.

मौ.दाती व मौ.भोसी, ता.कळमनुरी,जि.हिंगोली येथील स्वस्त धान्य दुकानाची पर्यायी व्यवस्था इतरत्र करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील कामगार अधिकारी कार्यालयाच्या अनागोंदी कारभाराबाबत.**

**(१७) १५३ (२३-१२-२०१४). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील कामगार अधिकारी कार्यालयातील उच्चपदस्थ अधिकारी व निरिक्षक यांना दोन जिल्ह्याचा कारभार असल्याने दोन्ही अधिकारी ३ दिवस काम करत असल्याने पूर्णपणे कामकाज होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कामगार कार्यालयातील रिक्त पदे त्वरीत भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१६-०२-२०१५) :** (१) हिंगोली जिल्ह्यातील सरकारी कामगार अधिकारी या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार किमान वेतन निरिक्षक, परभणी यांच्याकडे सूपूर्द करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) कामगार आयुक्त यांचे आस्थापनेवरील सरकारी कामगार अधिकारी या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी मागणी पत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आले आहे तसेच गट 'क' मधील रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश कामगार आयुक्त यांना देण्यात आले आहेत.

---

**राज्यात आधार कार्ड बनविण्याचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(१८) १८८ (१५-०१-२०१५). श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ओळखपत्र म्हणून ओळख बनू पाहणाऱ्या आधार कार्डच्या बाबतीत राज्यात संथगतीने काम सुरु असल्याने अद्यापही राज्यातील जवळपास निम्म्या नागरिकांचे आधारकार्ड तयार झाले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सर्वाधिक आधार कार्डधारक आणि सर्वात कमी आधार कार्डधारक नागरिकांची संख्या असलेले जिल्हे विदर्भातील असून वर्धा जिल्ह्यात ८८% तर वाशिम मध्ये ३८% आधारकार्ड असून मागील अनेक महिन्यापासून आधारकार्ड नोंदणीचे काम बंद होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे हे पाहता शासन त्वरित आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१५)** :(१) नाही.

(२) व (३) देशामध्ये महाराष्ट्र ८.८५ कोटीच्या आधार निर्मितीसह प्रथम क्रमांकावर आहे. वर्धा जिल्ह्यात ९३% आणि वाशिम जिल्ह्यात ७०% आधार निर्मिती झाली आहे. राज्यात ७९% आधार निर्मिती पूर्ण झाली असून GIS व SAS यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उर्वरित आधार निर्मीतीची कार्यवाही गावपातळीवरुन पूर्ण करण्यात येत आहे.

---

**नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील अनेक ठिकाणी आदिवासी वाडयांमधील रस्ते आणि वीजपुरवठा समस्यांबाबत**

**(१९) २५२ (२२-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ (ता. कर्जत, जि.रायगड) येथील अनेक ठिकाणी आदिवासी वाडयांमधील रस्ते आणि तेथील वीजपुरवठा समस्या अद्यापीही तशाच असून वनविभागाच्या पस्तीस सेक्शनमध्ये तर वनेत्तर कामांना पूर्णपणे बंदी आहे असे असतानाही कळंब तालुक्यातील भागुचीवाडी भागातील जंगलातील दुर्मिळ झाडे तोडण्यात आली वा येत असल्याचे माहे जून, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्जत तालुक्यातील अनेक भागात आजही वनविभाग आणि त्यांचे कायदे सर्वसामान्य नागरिकांसाठी अडचणीचे व जाचक ठरत असून या भागात जंगलतोड करण्यास व बांधकाम करण्यास बंदी असतानाही भागुची वाडी परिसरात झालेल्या दुर्मिळ झाडांच्या जंगलतोडीबाबतीत अद्यापही उचित कार्यवाही झाली नसल्याप्रकरणी शासन त्वरित आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०२-२०१५)** :(१) अलिबाग वनविभागातील कर्जत तालुक्यातील मौजे भागुची वाडी परिसरातील कळंब संपादीत वन सं.नं.८७ नवीन ३८ मध्ये साग बुडे ५ व अैन बुडे ९ मोह १ इंजायली २१ अशी एकूण ३६ बुडे किंमत रु.८८३५/- इतक्या वृक्षांची तोड झाली असून रु.४५५५/- एवढा माल जप्त केला आहे. प्रकरणी दिनांक १६.६.२०१४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास चालू आहे.

(२) सदरची अवैध वृक्षतोड निदर्शनास येताच तात्काळ वनगुन्हे नोंदवून भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलमांतर्गत कायदेशीर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) सदर गुन्ह्यामध्ये वेळीच कार्यवाही करण्यात आलेली असल्याने विलंब झालेली नाही.

---

**महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महानंद (महानंद) मध्ये दोन वर्षापासून पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक हे पद रिक्त असल्याबाबत**

**(२०) २६४ (२२-०२-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दूध उत्पादक शेतकरी आणि ग्राहकांचे हित जपणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी दूध (महानंद) दोन वर्षापासून पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक नसल्याने अप्रत्यक्षरित्या फटका दूध संकलनाला बसत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ च्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय?

(२) असल्यास, "महानंदा" या संस्थेचे रिक्त असलेले पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक पद लवकरात लवकर भरण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-०१-२०१५) :** (१) हे खरे नाही, माहे ऑगस्ट,२०१३ पासून महाराष्ट्रातील दुष्काळामुळे तसेच फॉन्टेरा, न्युझीलंड या कंपनीची दूध भुकटी जागतिक स्तरावर नाकारल्याने भारतातील दूध भुकटीची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे चढ्या दराने खाजगी दूध भुकटी कारखानदारांनी दूध खरेदी करुन दूध भुकटी निर्यात केली. याचा विपरीत परिणाम महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाकडे (महानंद) पिशवीबंद दूध संकलन कमी झाले.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंद) या संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालक या पदावर दिनांक ३०/०६/२००६ पासून अतिरिक्त कार्यभारावर व्यवस्थापकीय संचालकांची नियुक्ती करण्यात येत आहे.सद्य:स्थितीत सदर पदावर भारतीय प्रशासकीय सेवेमधील अधिकाऱ्याची नियुक्ती न झाल्याने महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालक या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार भा.प्र.से. मधील अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आला आहे.

---

**राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत**

**(२१) २६७ (२२-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या तसेच महाविद्यालयातील पायाभूत सुविधा व अध्यापकांची नेमकी स्थिती जाणून घेण्यासाठी अचानक

तपासणी करण्याचा निर्णय नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठाने घेतल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार आतापर्यंत राज्यातील किती वैद्यकीय महाविद्यालयांची चौकशी केली असून सदर चौकशीत ज्या महाविद्यालयात पायाभूत सुविधांचा अभाव आहे त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०२-२०१५) :**(१) होय.

(२) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने प्रथम टप्प्यात २० वैद्यकीय महाविद्यालयांची अचानक तपासणी केली असून, प्राप्त तपासणी अहवालांची छाननी करुन विद्यापीठाच्या विद्यापरिषेदच्या आगामी बैठकीत सदर अहवाल ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील अंजिठा लेण्याची झालेली दुरवस्था**

**(२२) ३११ (२२-१२-२०१४). श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील अंजिठा लेण्याची सतत पडणाऱ्या पावसामुळे दुरवस्था झाली असून डोंगरमाथा भुसभुशीत झाल्याने केव्हाही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरील लेण्यासह परिसराची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०९-०२-२०१५) :** (१) औरंगाबाद जिल्ह्यातील अंजिठा लेणी या राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून त्या केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत येतात. अधिक्षक पुरातत्वविद् भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय औरंगाबाद यांनी दिलेल्या माहितीनुसार हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आणे (ता. कराड, जि.सातारा) येथील बिबटयाच्या हल्ल्यात जखमी झालेल्या शेतकऱ्याला आर्थिक मदत न दिल्याबाबत**

**(२३) ३१३ (२२-१२-२०१४). श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आणे (ता. कराड, जि.सातारा) येथील माहे जुलै, २०१४ च्या पहिल्या सप्ताहात बिबटयाच्या हल्ल्यात शेतकरी जखमी झाल्याने वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी आर्थिक मदत देण्याचे आश्वासन देऊनही माहे ऑक्टोबर, २०१४ अखेरपर्यंत मदत देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बिबटयाच्या हल्ल्यात जखमी झालेल्या शेतकऱ्यास आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०३-२०१५) :** (१), (२), व (३) मौजे आणे (ता. कराड, जि.सातारा) येथील श्री.श्रीरंग तुकाराम देसाई हे बिबटयाचे हल्ल्यात दिनांक ०३.०७.२०१४ रोजी जखमी झालेले आहेत.

सदर जखमी शेतक-यास दिनांक ०४.१२.२०१४ रोजी रु. ४४,२२३/- रक्कम नुकसान भरपाई म्हणून अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**ठाणे-बेलापूर रोडवर असलेल्या नोसील कंपनीच्या कर्मचा-यांना आश्वासन देवून आर्थिक भरपाई न दिल्याबाबत**

**(२४) ३३७ (२३-१२-२०१४). डॉ. सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर रोडवर असलेल्या नोसील कंपनीच्या कर्मचा-यांना भविष्यात व्हीआरएसद्वारे जादा नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन देवून आर्थिक भरपाई न दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कर्मचा-यांना दिलेल्या आश्वासनानुसार आर्थिक भरपाई देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१२-०२-२०१५) :** (१) ठाणे-बेलापूर येथे स्थित असलेली मे.नोसिल लि. ही आस्थपना मे.रेलीन पेट्रोकेमिकल प्रा.लि.या आस्थपनेने सप्टेंबर, २००४ च्या सुमारास ताब्यात घेतली. तद्‌समयी कार्यरत असणा-या ५३८ कामगारांपैकी २७१ कामगारांनी दिनांक ११.९.२००४ रोजी मे.नोसिल लि., नोसिल एम्प्लॉईज युनियन व पील एम्प्लॉईज युनियन आणि मे.रेलीन पेट्रोकेमिकल प्रा.लि.यांचेमध्ये झालेल्या त्रिपक्षीय करारानुसार स्वेच्छानिवृत्ती स्विकारली. तद्‌नंतर मे.रेलीन पेट्रोकेमिकल प्रा.लि. यांनी जानेवारी, २००५ च्या सुमारास पुनःश्च स्वेच्छानिवृत्ती जाहीर केली. सदर योजनेला मुदतवाढ देताना भविष्यात व्ही.आर.एस.द्‌वारे जादा नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन देऊन देखील भरपाई न दिल्यास्तव उपस्थित करण्यात आलेले विवाद मा.औद्‌योगिक न्यायालय, ठाणे यांचेसमोर संदर्भीत करण्यात आले होते. मा.औद्‌योगिक न्यायालयाने दिनांक २४.११.२०११ रोजी दिलेल्या आदेशान्वये सदर संदर्भ फेटाळल्याने संबंधित कामगारांनी मा.उच्च न्यायालयात क्र.४८१०/२०१२ व इतर अन्वये याचिका दाखल केल्या होत्या. दिनांक १२ सप्टेंबर, २०१२ च्या आदेशान्वये मा.उच्च न्यालयाने सदरहू याचिका फेटाळल्या असून याचिकाकर्त्या कामगारांनी मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर अपील दाखल केले असून सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(२) प्रकरण न्याप्रविष्ठ आहे. तथापि, शासन स्तरावर दिनांक १२.११.२०१३ व तत्कालीन मा.पालकमंत्री (ठाणे) यांच्यासमोर दिनांक ६.११.२०१२ तसेच दिनांक ४.१२.२०१२ रोजी बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्याजवळील मुळा-मुठा कालव्यात पुणे शहरातील कचरा टाकण्यात येत असल्याबाबत**

**(२५) ४३९ (२२-१२-२०१४). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्याजवळील खडकवासला धरणातून निघणा-या व हवेली, दौंड, इंदापूर तालुक्यांना शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी मुख्य स्त्रोत असलेल्या मुळा-मुठा कालव्यात पुणे शहरातील कचरा टाकल्याचे दिनांक २७ ऑक्टोबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहराचा काही भाग, लोणी काळभोर, उरुळी कांचन, यवत अशा मोठ्या गावांना कच-यांच्या समस्यांनी ग्रासले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक औद्‌योगिक कारखान्यामधील कचराही कालव्यात टाकल्याने कालव्याचे पाणी शेती व अनेक गावांच्या पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांसाठी प्रदूषित पाणी वापरले जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. रामदास कदम (२३-०२-२०१५) :** (१) पुणे शहरातील कालव्यानजिक असलेल्या वसाहतीमधून काही प्रमाणात नागरी घनकचरा कालव्यात टाकला जातो.

(२) हे खरे आहे.

(३) औद्योगिक कारखान्यातील कचरा कालव्यात टाकल्याचे निदर्शनास आले नसून याबाबत संबंधित ग्रामस्थांकडून कोणतीही तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेली नाही.
(४) पुणे महानगरपालिकेस त्यांच्या हद्दीत निर्माण होणा-या नागरी घनकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रस्तावित आदेश बजावण्यात आले आहे. तसेच जल (प्रदूषणास प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये पुणे तसेच पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत फौजदारी खटला दाखल करण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

गटविकास अधिकारी, हवेली, दौंड यांना ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील नागरी घनकच-यांवर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ स्तरावर लेखी सूचना देण्यात आली आहे.

पुणे आणि पिंपरी - चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सांडपाण्यामुळे मुळा- मुठा नदीचे पाणी प्रदूषित झाल्याने नदीकाठच्या गावांमध्ये शुध्द पिण्याचे पाण्यासाठी दोन्ही महानगरपालिकांकडून आर.ओ.संयंत्र बसविण्यासाठी संबंधित जिल्हा परिषदेकडे ११.९५ कोटी इतका निधी वर्ग करण्यात आला आहे. सदर निधीतून मंजूर केलेल्या एकूण १२१ कामांपैकी १४ कामे पुर्ण करण्यात आली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

---

**झेंडू फुलाला योग्य बाजार भाव मिळणेबाबत**

**(२६) ४४४ (२३-१२-२०१४). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना दिपावलीमध्ये ३० रू.किलो या दरानेच माहे ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात झेंडू फुलाला बाजार मिळाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, झेंडू उत्पादकांना ३० रूपये किलो किरकोळ बाजारात मिळत असतांना ग्राहकांना मात्र ८० रूपये किलो दराने झेंडू विकला गेला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील शेतक-यांच्या शेतमालाला बाजार मिळत नसताना शेतक-यांऐवजी व्यापारी किंवा मध्यस्थांकडून मोठ्या प्रमाणात नफा कमविण्याचे प्रमाण वाढले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील शेतकरी ते थेट ग्राहक ही योजना शासनाने राबविण्याचे जाहीर करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०२-२०१५) :** (१) व (२) अंशतः खरे आहे. झेंडू फुलांना दिवाळीच्या आदल्यादिवशी सरासरी रु.३० /- प्रतिकिलो व लक्ष्मीपूजनादिवशी सरासरी रु.४० ते ६० इतका प्रतिकिलो भाव होता.

(३), (४) व (५) राज्यामध्ये दसरा व दिवाळीच्या सणादरम्यान झेंडू फुलांची विक्री ही मुख्यत्वे थेट शेतक-यांमार्फत केली जाते. त्यामुळे शेतकरी ज्या भावाने विक्री करतात त्याच भावाने व्यापारी किरकोळ विक्री करतात. त्याचप्रमाणे नाशवंत मालाचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न झाल्यास तो प्रत्यक्षपणे ग्राहकापर्यंत पोहोचण्यास त्यामध्ये असणारे मध्यस्थ, वाहतूक हमाली, बाजार फी यामुळे मालाची किंमत वाढते. शेतकरी ते थेट ग्राहक ही योजना प्राथम्याने राबविण्यात येत आहे.

---

**चासकमान प्रकल्प ता. राजगुरुनगर (खेड) जि. पुणे प्रकल्पाच्या सुधारीत अंदाज पत्रकाची प्रशासकीय मान्यता प्रलंबित असल्यबाबत**

**(२७) ४५७ (२३-१२-२०१४). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चासकमान प्रकल्प (ता. राजगुरुनगर (खेड) जि. पुणे) प्रकल्पाच्या सुधारीत अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता शासन स्तरावर मागील ४ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारीत प्रशासकीय मान्यता नसल्यामुळे निधी उपलब्ध असूनही प्रकल्पांच्या बांधकामे वितरीका व अस्तरीकरण यावर खर्च करता येत नाही हे खरे आहे,

(३) असल्यास, अपूर्ण वितरीका व गळती यामुळे प्रकल्पाचा पुर्ण फायदा होत नाही असे निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चासकमान प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :**(१) होय,

(२) होय,

(३) होय,

(४) प्रचलित कार्यपध्दतीनुसार प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**शासनाने विविध विकास कामांसाठी निधी विविध विभागांना दिल्याबाबत**

**(२८) ४६४ (२२-१२-२०१४). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मागील १० वर्षात विविध विकास कामांसाठी ७१ हजार ५६३ कोटी रूपयांचा निधी विविध विभागांना दिला होता, हे खरे आहे काय,

(२) तसेच १९९० पासुन अशा प्रकारच्या १०२९ कोटी २७ लक्ष रुपयांच्या खर्चाची बिले विविध विभागाकडून अद्‌याप पर्यंत प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिलेल्या ७१ हजार ५६३ कोटी निधी पैकी ६५ हजार ४५३ कोटी रूपयांचा हिशोब विविध शासकीय विभागाकडून सादर करण्यात आला मात्रा ६ हजार ११० कोटींचा हिशोब लागत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्‌यास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वाटप निधी २००४ ते ०५ सालापासुन असुनही अद्‌याप निधी खर्चाचा तपशिल विविध विभागाकडून वित्त विभागाला सादर झाला नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन स्तरावरून याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०२-२०१५) :**(१) ते (४) शासनाकडून शासनमान्य संस्थेना विविध विकास कामासाठी सहायक अनुदान वितरीत करण्यात येते. वितरीत सहायक अनुदानाच्या रकमेपैकी रु. ७१ हजार ५६३ कोटी रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यात आली नसल्याचे महालेखापाल कार्यालयाने शासनाच्या निदर्शनास आणले आहे.

संक्षिप्त देयकावर मंजूर करण्यात आलेल्या रकमेपैकी रु. १०२९ कोटी २७ लक्ष रुपयांची तपशिलवार देयके प्रलंबित असल्याचे महालेखापाल कार्यालयाने शासनाच्या निदर्शनास आणले आहे.

प्रलंबित संक्षिप्त देयके व उपयोगिता प्रमाणपत्रे यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून तरीही प्रलंबितता राहिल्यास प्रशासकीय विभागांना संबंधित विभागातील जबाबदार अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत वित्त विभागाच्या क्र.मआख- २०१४ /प्र.क्र. ४२/विनियम, दि. ९.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर प्रलंबितता कमी करण्याकरीता सचिव (ले.व.को.) वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दर महिन्याला मंत्रालयीन विभागांनी नियुक्त केलेल्या नोडल अधिका-यांसमवेत बैठक घेण्यात येते. तसेच, वित्त विभागाकडे प्राप्त होणा-या (संक्षिप्त देयके/सहायक अनुदान) व्ययविषयक अनौपचारिक संदर्भाच्या धारिकेत वित्त विभागाकडून सदर प्रलंबितता कमी करण्याच्या सूचना वेळोवेळी देण्यात येत असतात.

---

## ५ हजार पेक्षा अधिक लोक संख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र अभियंत्याची नेमणूक करणे

**(२९) ४६७ (२२-१२-२०१४). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी ५ हजार पेक्षा अधिक लोक संख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र अभियंत्याची नेमणूक करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यासाठी १८० पंचायत अभियंते व १३ गट अभियंते यांची पदे मंजुर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात ७० अभियंत्याची दिनांक १९ ऑक्टोबर, २०१४ च्या दरम्यान नियुक्ती देखील केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील ग्रामपंचायतींना अभियंत्यांची नेमणूक केल्याने ग्रामपंचयातींना पुर्वी प्रमाणे बांधकाम परवाने देण्याबाबत व गावठाण हद्दीतील व गावठाण हद्दीबाहेरील बांधकामांच्या नोंदी घेण्याबाबतचे अधिकार देण्याबाबत शासन स्तरावरुन याबाबत कुठली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे-पालवे (३०-०१-२०१५) :** (१) ते (३) हे खरे नाही.

परंतु राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांतर्गत ग्रामपंचायत व पंचायत स्थरावरील कामांना गती देण्याकरीता तांत्रिक मनुष्यबळ कंत्राटी तत्वावर उपलब्ध करुन देण्याचे प्रयोजन केले आहे. त्यानुषंगाने पुणे जिल्ह्याकरीता १८० पंचायत अभियंते व १३ गट अभियंते यांची कंत्राटी पदे मंजूर आहेत.

या योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यांतर्गत ७० पंचायत अभियंता यांची ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींच्या ठिकाणी १ डिसेंबर, २०१४ पासून नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठा अंतर्गत असलेल्या २२ कृषि महाविद्यालयातील प्राध्यापकांना कृषी विद्यापीठाची मान्यता नसल्याबाबत**

**(३०) ४७१ (२४-१२-२०१४). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठा अंतर्गत असलेल्या २२ कृषि महाविद्यालयातील प्राध्यापकांना कृषी विद्यापीठाची मान्यता नसल्याचे दि. २८ ऑक्टोंबर, २०१४ च्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे,
(२) असल्यास, कृषी विद्यापीठ अधिनियम १९९० नुसार खाजगी कृषी महाविद्यालयातील प्राध्यापकांना कृषी विद्यापीठाची मान्यता घेणे बंधनकारक आहे हे खरे आहे,
(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) संलग्न संस्थांकडून कर्मचाऱ्यांचे नियुक्ती संबंधिचे निकष पुर्ण केलेले प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाची मंजूरी प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येत असते. परंतु असे प्रस्ताव प्राप्त झाले नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंडवा (जि.पुणे) येथील शासकीय महिला निरीक्षण गृहाची इमारत वापराविना पडून असल्याबाबत

**(३१) ५११ (२२-१२-२०१४). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंढवा (जि.पुणे) येथे कोटयावधी रुपये खर्च करुन बांधलेल्या शासकीय महिला निरीक्षण गृहाची इमारत वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाकडून देहविक्री व्यवसाय केलेल्या तरुणीचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांना महिला सुरक्षा गृहात ठेवले जाते परंतु जुन्या इमारतीत तीस महिला वास्तव्य करु शकतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गृहाची दुरावस्था सुधारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे-पालवे (०९-०२-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) संस्थेची नवीन बांधलेली इमारत ताब्यात घेण्यासाठी इमारतीतील विजेचे कनेक्शन व महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त नसल्यामुळे, इमारतीचा ताबा घेऊन इमारत वापरात आणता आलेली नाही. सदरचे प्रमाणपत्र लवकरात लवकर प्राप्त करुन घेणेकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जात प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया जाचक असल्याबाबत**

**(३२) ५२७ (२२-१२-२०१४). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. किसन कथोरे (मुरबाड), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी वडीलांच्या जन्मगांवी जाऊन दाखला घेण्याबाबत शासनाने परिपत्र काढले आहे, हे खरे आहे काय,

(२) बहुतांशी व्यक्तींचा जन्म हा मामाच्या गांवी झालेला असुन मुळ गाव व जन्मगांव यात तफावत असल्यामुळे जात प्रमाणपत्र मिळविण्यात अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही जाचक अट रद्द करण्याबाबत मोठ्या प्रमाणात मागणी होत असून नागरीकांना जात प्रमाणपत्र सुलभरित्या मिळण्यासाठी शासन स्तरावर काय उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०२-२०१५) :**(१) शासनाच्या दि.१ सप्टेंबर, २०१२ च्या अधिसूचनेन्वये "महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२" विहित करण्यात आले आहेत.

(२) अशा प्रकारची कोणतीही बाब अद्यापपर्यंत आढळून आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मातंग समाजाला आरक्षण देण्याबाबत.**

**(३३) ५९४ (२५-११-२०१४). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय मातंग संघाने राज्यातील मातंग समाजाला स्वतंत्र ८ टक्के आरक्षण द्यावे तसेच इतर मागण्यासाठी दिनांक २८ ऑक्टोबर, २०१४ रोजी मंत्रालयावर धडक मोर्चा काढला होता तसेच यापुर्वीही शासनाकडे वारंवार मागणी केलेली होती, खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, वा त्यात काय आढळून आले व त्यानुसार मातंग समाजाच्या आरक्षणासंदर्भात तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णू सवरा (०२-१२-२०१४)** : (१) सदर मागण्यांसाठी आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन चालू आहे.
(२) मातंग समाज अनुसूचित जाती या प्रवर्गात पुन्हा वर्गवारी करणे घटनाबाहय आहे व राज्य शासनास वर्गवारी करण्याचे अधिकार नसून संसदेस सदर अधिकार आहेत.

मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास होण्याचे दृष्टीने शासनाने क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग स्थापन करण्यात आला होता. या विभागाच्या दि. ३१/१२/२०११ च्या शासन निर्णयान्वये क्रांतिवील लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयागाने शासनास सादर केलेल्या एकूण ८२ शिफारशींपैकी ६८ शिफारशी तत्वतः मान्य करण्यात आल्या असून त्याबाबत विविध विभागाकडून अंमलबजावणी करण्यात येत आहे. आरक्षणाविषयक शिफारशीसह उर्वरित १४ शिफारशी अमान्य करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुरबाड तालुक्यातील (जि.ठाणे) अनेक मजुर कामगार सहकारी संस्थेतील गैरप्रकाराबाबत

**(३४) ६३२ (२२-१२-२०१४). श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड तालुक्यातील (जि.ठाणे) अनेक मजुर कामगार सहकारी संस्थेतील मजुरांचे आर्थिक शोषण व पिळवणूक करीत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मजूर कामगार सहकारी संस्थेतील अध्यक्ष व सचिवांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०९-२०१६)** :(१) सन्मा. विधानसभा सदस्य, श्री.किसन कथोरे यांनी सदर विषयाबाबत दिनांक २३.१२.२०१४ च्या पत्रान्वये मुरबाड तालुक्यातील (जि.ठाणे) बोगस मजूर कामगार संस्थांच्या बेकायदेशीर कारभाराची चौकशी करण्याची विनंती केलेली आहे.
(२) सदर प्रकरणाची चौकशी करुन व त्या चौकशीच्या अनुषंगाने त्वरीत कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांचेमार्फत दिनांक २९.१२.२०१४ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरबाड यांना सूचित करण्यात आले आहे. त्यास अनुसरून सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरबाड यांनी दिनांक २.१.२०१५ रोजी संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांना दिलेल्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८९ (अे) अनुसार सहकारी अधिकारी (श्रेणी-२) यांचेमार्फत दप्तर तपासणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुळगाव-बदलापूर नगरपालिका हद्दीमध्ये असणाऱ्या शिधावाटप अधिकारी कार्यालयाची झालेली दुरावस्था.**

**(३५) ६४८ (२३-१२-२०१४). श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)कुळगाव-बदलापूर नगरपालिका हद्दीमध्ये (ता.अंबरनाथ जि. ठाणे) असणाऱ्या शिधावाटप अधिकारी कार्यालयाची अतिशय दुरावस्था झालेली असून त्याठिकाणी भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यालय असल्याचे व अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने नागरिकांची व अधिकाऱ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिधावाटप अधिकारी कार्यालयाच्या व्यवस्थेबाबत व पुरेसा कर्मचारी वर्ग देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. गिरीश बापट (२७-०१-२०१५) :**(१) व (२) शिधावाटप कार्यालय क्र. ४६/फ, बदलापूर हे कार्यालय दि. १ जून, १९९० पासून खाजगी मालकीचया ८१५.७२ चौ. फू.जागेत कार्यरत असून कार्यालयातील जागेचा भाग नागरीकांसाठी मोकळा ठेवण्यात आला आहे. त्यामुळे अधिकारी/नागरीकांची गैरसोय होण्याच्या प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, ही खाजगी जागा असल्याने या कार्यालयासाठी सुयोग्य जागा मिळणेबाबत सार्वजनिक बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार सुरु आहे.

रिक्त पदे भरण्यात लोकसेवा आयोगाकडे वेळोवेळी मागणी नोंदविली असून वेळोवेळी पदे भरण्याबाबत येत आहेत. तथापि उपलब्ध कर्मचा-यांकडून नागरिकांची कामे करुन घेण्यात येत आहे, याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई ते गेट वे ऑफ इंडिया अशी जलवाहतूक सुरु करणेबाबत.**

**(३६) ७१८ (१५-०१-२०१५). श्री. मनोहर भोईर (उरण), श्री. संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील नियोजित विमानतळ सुरू झाल्यावर मुंबई व उपनगरातून तेथे जलद गतीने पोहचता यावे यासाठी नवी मुंबई ते गेट ऑफ इंडिया किंवा सीबीडी ते भाऊचा धक्का अशी जलवाहतुक सेवा सुरू करण्याचा शासनाने नुकताच निर्णय घेऊन त्यासाठी १०० कोटी रूपयांची तरतुद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतून समुद्रमार्गे जलवाहतूक सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०२-२०१५) :** (१), (२) व (३) भाऊचा धक्का ते नेरुळ व भाऊचा धक्का ते मांडवा अशी जलवाहतूक सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. अद्याप निर्णय झालेला नसल्याने तरतूद करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

---

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील रसायनी हद्दीतील रिसवाडी गावाजवळ व्यावसायिकांकडून सुमारे २७ लाख २६ हजारांचा ऐवज लुटल्याबाबत.**

**(३७) ७२१ (२३-१२-२०१४). श्री. मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील रसायनी हद्दीतील रिसवाडी गावाजवळ पिस्तुलाच्या धाकाने हॉटेल व्यावसायिकांकडून सुमारे २७ लाख २६ हजारांचा ऐवज लुटल्याची घटना दिनांक २० जुलै, २०१४ रोजीच्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाचा तपास करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०१५) :** (१) दिनांक २९.०८.२०१४ रोजी मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर रसायनी पोलीस ठाणे हद्दीत रिसवाडी गावाजवळ पिस्तुलाच्या धाकाने हॉटेल व्यवसायीकाकडून सुमारे ३६ लाख २६ हजार रुपयाचा ऐवज तसेच वाहनास लुटल्याची घटना घडलेली आहे.

(२) होय. सदरबाबत रसायनी पोलीस ठाणे कॉ.गु.र.नं. ६० /२०१४ भादंविसं कलम ३९२, ३४ सह आर्म ॲक्ट ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) सदरचा गुन्हा हा पोलीस तपासांवर प्रलंबित आहे.

---

**बिरवाडी (ता. महाड, जि. रायगड) येथे कालबाहय पोषण आहाराचे वाटप झाल्याबाबत**

**(३८) ७६५ (२२-१२-२०१४). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या एकात्मिक बाल विकास विभागातर्फे आयुक्तलयात एकात्मिक बाल विकास सेवा योजने अतंर्गत पोषण आहाराचे अंगणवाडयांना वाटप करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) बिरवाडी (ता.महाड जि.रायगड) अंगणवाडयांना वाटप झालेला पोषण आहार हा कालबाहय झाल्याचा प्रकार दिनांक १६ जुलै, २०१४ रोजी निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, कालबाहय पोषण आहार वाटप करणा-या संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे-पालवे (०३-०२-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर पोषण आहाराची पाकीटे कालबाहय असल्याचे अंगणवाडी सेविकेच्या निदर्शनास आल्याने ते ताब्यात घेण्यास नकार दिला.

(३), (४) व (५) याबाबत महाड एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, महाड-रायगड येथे दि.१७/०७/२०१४ प.नॉ.कॉ.रजि. नं.९४/२०१४ भादंविसं कलम २७३, ३४ अनवये संबंधिताविरुध्द अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आलेला असून कायदेशीर कारवाई पोलीसाकडून सुरु आहे.

---

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील अनेक गावांच्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यंत्रणेअंतर्गत कामांना मंजूरी देणेबाबत**

**(३९) ७६८ (२३-१२-२०१४). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील अनेक गावांचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यंत्रणे अंतर्गत समावेश असून गावांच्या विकासासाठी रस्त्यांची व इतर सुविधांबाबत कामांचे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणेत आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित कामांना मंजूरी देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०१५) :** (१) व (२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर प्रदेशातील ग्रामीण क्षेत्राच्या विकासाकरिता एकात्मिक ग्राम विकास योजना राबविण्यात येत असून सदर योजनेतंर्गत जिल्हा परिषद रायगड यांनी अलिबाग तालुक्यातील १० गावातील १९ कामांचे प्रस्ताव प्राधिकरणास सादर केले असून या कामांना प्राधिकरणाने मंजूरी दिली आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील राई येथे होणा-या धामणी मध्यम प्रकल्पाबाबत**

**(४०) ७७१ (२४-१२-२०१४). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील राई येथे होणा-या ३.८५ हजार दशलक्ष घनफुट (टीएमसी) क्षमतेच्या धामणी मध्यम प्रकल्पासाठी सन १९९५-९६ च्या दर सुचिनुसार रु.१२० कोटी ३० लाख रूपयांच्या किंमतीस दिनांक २४ डिसेंबर, १९९६ ला मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली हे खरे आहे काय,

(२) या प्रकल्पावर जून २०१४ पर्यंत २९५ कोटी रूपये खर्च झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पात सध्या पाण्याचा थेंबही नसून सुधारित प्रशासकीय मान्यतेपासून तब्बल १८ वर्षे प्रकल्पाचे काम अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, तब्बल १८ वर्षे प्रकल्पाचे काम रखडण्याची कारणे कोणती,

(५) असल्यास, याबाबत प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या स्वरुपाची उपाययोजना अंमलात आणण्याचे ठरविले आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) वनजमीन व अभयारण्यातील क्षेत्र हस्तांतरण, खाजगी जमिनीचे भुसंपादन, पुनर्वसनातील विलंब, सुप्रमा व अपुरा निधी यामुळे प्रकल्पाचे काम रखडलेले आहे.

(५) १) प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या १०४ हेक्टर इतक्या वनजमिनीच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता प्राप्त करुन घेण्यात आली आहे.

२) खाजगी जमिनीचे भूसंपादन व पुनर्वसन कार्यवाही महसूल विभागाशी समन्वयाने करण्यात येत आहे.

३) द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे स्तरावर तपासणीधीन आहे.

---

**शिंदखेडा (जि. धुळे) तालुक्याचा मानव विकास मिशनतंर्गत समावेश होऊन वर्ष झालेले असताना मागणी केलेल्या कामांना अद्याप शासनाने मंजूरी दिलेली नसल्याबाबत**

**(४१) ८०६ (२२-१२-२०१४). श्री. जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदखेडा (जि. धुळे) तालुक्याचा मानव विकास मिशनतंर्गत समावेश होऊन वर्ष झालेले असताना देखील शिंदखेडा तालुक्याच्या लोकप्रतिनिधींनी मागणी केलेल्या कामांना अद्याप शासनाने मंजूरी दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिंदखेडा तालुक्याचा मानव विकासाचा निर्देशांक हा सिंचनाअभावी कमी असल्यामुळे याठिकाणी अस्तित्वात असलेल्या नद्या आणि नाल्यांवर हेड टू टेल बंधारे तथा अन्य सिंचनाची कामे या कार्यक्रमांतर्गत राबविण्यात यावीत अशी मागणी प्रधान सचिव, (नियोजन) यांच्याकडे झालेल्या बैठकीत करण्यात आली होती हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०१-२०१५) :** (१), (२) व (३) धुळे जिल्ह्यातील मानव विकास कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी दि.१८.३.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी तपासली असता असे दिसून आले की, जलसंधारण विभागाकडून साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध बांधण्याचा कार्यक्रम सन २०१२-१३ पासून राबविण्यात येत आहे. तसेच जलसंधारण विभागाने दि.९ मे, २०१३ च्या शासन निर्णयान्वये त्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामुळे सदर मागणीच्या अनुषंगाने सादर केलेला प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यात तापी नदीवर सुलवाडे, सारंगखेडा आणि प्रकाशा या तिन्ही ठिकाणी पर्यटनस्थळ विकास करण्याबाबत**

**(४२) ८०९ (२३-१२-२०१४). श्री. जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यात तापी नदीवर सुलवाडे, सारंगखेडा आणि प्रकाशा या तिन्ही ठिकाणी बॅरेज बांधण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी अडविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी पर्यटनस्थळ विकास कार्यक्रमांतर्गत सदरहू ठिकाणांचा विकास साधण्याची मागणी सातत्याने लोकप्रतिनिधींकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतीत या पर्यटनस्थळांचा विकास करण्याबाबत शासनाने काय निर्णय घेतलेला आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०१५) :** (१) होय.
(२) प्रश्नाधीन मागणी पर्यटन विभागास व जिल्हाधिकारी, धुळे व जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोंढाणे (ता.कर्जत,जि.रायगड) धरणाचे काम त्वरीत पूर्ण करणेबाबत**

**(४३) ८३० (२२-१२-२०१४). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील (ता.कर्जत) कोंढाणे धरणाचे काम सन २०११ मध्ये सुरु करण्यात आलेले मात्र काही तांत्रिक बाबींमुळे माहे एप्रिल, २०१२ पासून बंद ठेवण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार धरणाचे काम त्वरित पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०२-२०१५) :**(१) होय.
(२), (३) व (४) नाही, प्रकल्पाचे काम शासन मान्यतेशिवाय सुरु केल्यामुळे प्रकल्पास मान्यता देणे शक्य होणार नाही.

---

**कर्जत-खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील एमएमआरडीए व भारत निर्माण योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४४) ८३२ (२२-१२-२०१४). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील कर्जत-खालापूर तालुक्यात एमएमआरडीए व भारत निर्माण योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे चालू आहेत, हे खरे आहे काय,

(२) सदर ग्रामीण आदिवासी भागात काही कामे अपूर्णावस्थेत असल्याने नागरिकांचे पाण्याअभावी प्रचंड  हाल होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव यादव (लोणीकर) (०३-०३-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, नागरिकांचे पाण्याअभावी प्रचंड हाल होत आहेत, हे खरे नाही.

(३) अपूर्ण योजना पूर्ण करणेबाबत ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या बैठका घेऊन काम पुर्ण करणेबाबत सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. अपूर्ण योजना पूर्ण न केल्यास पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील परिपत्रक जस्वप्र २००७/वित्तीय सल्लागार प्र.क्र.१ पापु-११ मंत्रालय, मुंबई दि.१७.११.२००७ अन्वये संबंधित ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल अशा नोटीसा संबंधितांवर बजावण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात ३०० हून अधिक अंगणवाड्या असून कायमस्वरुपी प्रकल्प अधिकारी नसल्याबाबत**

**(४५) ८३६ (२२-१२-२०१४). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात ३०० हून अधिक अंगणवाड्या असून कायमस्वरुपी प्रकल्प अधिकारी नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंगणवाडयांची एकदाही तपासणी झाली नसून अंगणवाडीतील १७ हजार बालकांचे शिक्षणाचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार अंगणवाड्यांना प्रकल्प अधिकारी नेमणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे-पालवे (१६-०२-२०१५) :** (१)  हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) प्रभारी बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) व मुख्यसेविका यांचेमार्फत अंगणवाड्यांची तपासणी केलेली आहे.

बाल विकास प्रकल्प अधिकारी गट-ब पदे ग्रामीण प्रकल्पाकडील असून सदर पदे दिनांक २८.५.२०१३ पासून महिला व बाल विकास विभागाकडे वर्ग झालेली आहेत.

तसेच इतर अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार देऊन कामकाज सुरु आहे. सदर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरून सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यातील (जि. रायगड) परळ, पनवेल, नेरळ-मंचर भिमाशंकर हया रस्त्याचे काम वनजमिनीच्या अडथळयामुळे पूर्ण होऊ शकले नसल्याबाबत**

**(४६) ८३९ (२२-१२-२०१४). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि. रायगड) परळ, पनवेल, नेरळ-मंचर भिमाशंकर हया रस्त्याचे काम वनजमिनीच्या अडथळयामुळे पूर्ण होऊ शकले नाहीत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामासाठी असलेले अडथळे दूर करुन सदर रस्ते वाहतुकीसाठी खुले करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०१-२०१५) :**(१) हे खरे नाही.

कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) कोठिंबे-भिमाशंकर घाट रस्त्याचे बांधकामासाठी १०.६८२४ हे वनक्षेत्र वळतीकरणाच्या प्रस्तावास केंद्र शासनाने दि.२६/०९/२०१३ च्या पत्रान्वये काही अटींच्या अधीन राहून अंतिम मान्यता दिली आहे.

सदर क्षेत्र भिमाशंकर अभयारण्यापासून १०.०० कि.मी. च्या आत असल्याने प्रकल्प यंत्रणेने मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाची मान्यता प्राप्त केली नसल्याने वनक्षेत्राचे वळतीकरण अद्याप करयात आलेली नाही.

(२) व (३) प्रकल्प यंत्रणेकडून वरीलप्रमाणे मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाची मान्यता प्राप्त केल्यानंतर वनक्षेत्र वळती करणाबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येईल.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातील बहुतांश पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४७) ८५२ (२२-१२-२०१४). श्री. वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बहुतांश पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असून गेल्या अनेक वर्षापासून प्रकल्प प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षिण कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळांतर्गत टाळंबा हा मोठा पाटबंधारे प्रकल्प तर नरडवे, अरुणा, सरंबळ, देवघर कोर्ले-सातंडी हे मध्यम तसेच कळसुली-देदोंनवाडी ओटव, तरंदळे, नाधवडे, शिरशिंगे असे लघु पाटबंधारे प्रकल्प अनेक वर्षे रखडल्याने दरवर्षी त्यांचा खर्च वाढतच चालला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रलंबित प्रकल्प पूर्णात्वास नेण्याकरिता शासनाने भरीव निधीची तरतुद केली आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २८ प्रकल्प पूर्ण झाले आहेत व १५ प्रगतीपथावर आहेत.

(२) देवघर, कोर्ले-सातंडी, कळसुली-देदोंनवाडी, ओटव, तरंदळे, नाधवडे या प्रकल्पावर पाणीसाठा निर्मिती होऊन देवघर, ओटव, तरंदळे व नाधवडे या प्रकल्पाच्या धरणात प्रत्यक्ष पाणीसाठा झाला आहे. कोर्ले-सातंडी प्रकल्पावर चालू हंगामापासून पाणीसाठा करण्यात येत आहे. अरुणा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून टाळंबा, नरडवे, सरंबळ व शिरशिंगे या प्रकल्पावरील वन व वनसंज्ञेखालील जमीन वळतीकरणाच्या प्रस्तावास मान्यता घेण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) व (४) वरील प्रकल्पांपैकी नरडवे व अरुणाया मध्यम प्रकल्पांना केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत केंद्रीय अर्थ सहाय्य प्राप्त होत आहे. तसेच, उर्वरित प्रकल्पांना शासनाच्या आर्थोपायाच्या स्थितीनुसार निधी उपलब्ध होत आहे.

---

**श्रीवर्धन (जि. रायगड) तालुक्यातील दक्षिण काशी समजल्या जाणा-या श्रीहरिहरेश्वर येथे पर्यटन क्षेत्र विकासाबाबत**

**(४८)** *८५८* **(२३-१२-२०१४). श्री. भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील दक्षिण काशी समजल्या जाणा-या श्रीहरिहरेश्वर येथे पर्यटन क्षेत्र विकासाचे सन २००४ पासून सुरू असलेले काम अत्यंत संथगतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम करणा-या ठेकेदारांवर कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे ठेकेदार आपल्या मर्जीप्रमाणे काम करित असून कोणालाही विश्वासात न घेता काम करित असल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्यःस्थितीमध्ये सुरू असलेले काम बंद अवस्थेत असल्यामुळे अनेक मातीचे मोठमोठे ढिग व मोठमोठे दगड मंदिरा परिसरातील रस्त्यावर जमा ठेवले आहेत त्यामुळे

येणाऱ्या भाविकांना व पर्यटकांना नाहक त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१५) :** (१) श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथील विकास प्रकल्पाची प्रत्यक्ष क्षेत्रिय स्थळावरील कामे ही जागे अभावी, वनजमिन व तांत्रिक दृष्ट्या सुसाध्य होत नसल्याने १० पैकी २ कामे वगळण्यात आली असून उर्वरित ८ कामांपैकी ४ कामे पूर्ण झाली आहेत, तर ३ कामे प्रगतीत आहेत व लॅन्ड स्केपींगचे काम मंदीर परिसरातील कामे पुर्ण केल्या शिवाय हाती घेता येत नसल्याने कामक अद्याप सुरु करण्यात आलेले नाही. कामाचा दर्जा उत्तम राखला जात आहे.
(२) नाही.
(३), (४) व (५) श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथील विकास कामापैकी गावात शिरतानाची कमान, नवाब लेक परिसर सुधारणा, अस्थी विसर्जन परिसर, इन्फ्रास्ट्रक्चर व भुमी सुधारणा ही कामे पुर्ण झाली आहेत. हरिहरेश्वर मंदिर परिसर सुधारणा, धर्मशाळा व परिसर तसेच स्मशानभूमी परिसर ही कामे प्रगतीत असून ही कामे मंदिर परिसरात येत असल्याने तेथे भाविक व पर्यटकांची सतत वर्दळ असल्याने त्यांना कोणत्याही प्रकारची असुविधा निर्माण होऊ नये याची दक्षता घेण्यात येत असल्यामुळे काही कामे संथगतीने सुरु आहेत.

---

### राज्यातील मच्छिमारांना शासनाकडून डिझेल परतावा मिळण्याबाबत

**(४९) ८७५ (२७-०१-२०१५). श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मच्छिमारांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या डिझेल परताव्याची कोटयावधीची रक्कम मागील १५ महिन्यांपासून मिळालेली नसल्याचे माहे नोव्हेंबर,२०१४ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय?
(२) असल्यास,सदरहू मच्छिमारांना डिझेल परताव्याची रक्कम मिळण्यासाठी शासन स्तरावर त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार आहे काय वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाघरण कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर योजनेंतर्गत उपलब्ध तरतूदीतून प्राप्त प्रस्तावांना डिझेल परताव्याची रक्कम अदा करण्यात येते. सन २०१३-१४ मध्ये प्राप्त तरतूद रु.७०.०० कोटी अदा करण्यात आली असून सन २०१४-१५ मध्ये नोव्हेंबर, २०१४ अखेर प्राप्त तरतूद रु.३६.०० कोटी १५२ संस्थांना वाटप करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणात आंतरराष्ट्रीय दर्जाचे सुविधा असलेले टुरिझम कॉरिडॉर उभारण्याबाबत**

**(५०) ९१० (२३-१२-२०१४). श्री. संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात आंतरराष्ट्रीय दर्जाचे सुविधा असलेले टुरिझम कॉरिडॉर उभारण्यात यावे अशी मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे कोकण भूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष यांनी माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०१५) :** (१) नाही.

तथापि, या विषयाचे निवेदन दिनांक ११/१२/२०१४ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर निवेदन तपासण्यात येत आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.